NES High School, Bhandup

III Preliminary Examination

Date : 2.02.2019 | Sub : Marathi | Marks : [illegible]

Std. : X, Div. ____ | Pages : 05 | Time : 2 Hrs.

Roll No.______

## गदयविभाग

प्र.१ अ) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१) आकृतिबंध पूर्ण करा. (०२)

- अभ्यासामध्ये लेखकाला जाणवणा-या अडचणी
  - [ ]
  - [ ]
- युनियन हायस्कूलमधील शिक्षकांची वैशिष्टये
  - [ ]
  - विदयार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये स्वतःला झोकून देणे
  - [ ]

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्याची वेळ आली त्यावेळी तर आणखी एक मोठं संकट समोर आलं. त्यावेळची हायस्कूलची प्रवेश फी एकवीस रूपये होती; पण आमच्याजवळ एवढे पैसे कुठून येणार प्रवेश फी भरणे [illegible] धीर सोडला नाही. आजूबाजूच्या घि-हाडांतील काही कामे करून तिचे पैसे जमवण्यास सुरूवात केली. त्याच वेळी तिच्या परिचयातील एक माऊली मदतीला धावली आणि माझ्या प्रवेश फीची व्यवस्था झाली; पण तोपर्यंत गिरगावातील त्यावेळच्या नामांकित शाळांमधले प्रवेश बंद झाले होते.

अखेर युनियन हायस्कूलमध्ये मला प्रवेश मिळाला आणि माध्यमिक शिक्षणाचा पुढील टप्पा सुरु झाला. अनेक अडीअडचणींमधून मी जमेल तेवढा अभ्यास करत होतोच; पण त्या छोटयाशा खोलीतील जागा अपूरी पडायची. अभ्यासाला पूरक वातावरण नव्हते. मात्र त्याही वातावरणात मी जिद्दीने अभ्यास करत राहिलो आणि परीक्षेत चांगलं यश मिळत गेलं. या युनियन हायस्कूलमधले शिक्षक, त्यांची सेवाभावी वृत्ती, विदयार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये त्यांचे स्वतःला झोकून देणे आणि निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासाचाच पाया पक्का झाला असं नाही, तर आयुष्याचाच पाया पक्का झाला. शिक्षणाबद्दल एक आंतरिक ओढ वाटू लागली.

२) १. चौकटी पूर्ण करा. (०१)

अ. लेखकाची हायस्कूलची प्रवेश फी [ ]

ब. लेखक माध्यमिक शिक्षण घेत असलेली शाळा [ ]

Scanned by CamScanner

२. लेखकाला गिरगावातील नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळाला नाही कारण... (०१)

३) व्याकरण

खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा. (०२)

१. पिंपळकट्टयावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात येत असतात.

२. आई कष्टाची कामे करत होती.

४) स्वमत (०२)

'माझ्या जीवनातील शिक्षकांचे स्थान' या विषयावर तुमचे विचार लिहा.

प्र. १ आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१) आकृत्या पूर्ण करा. (०२)

१. [ ] ← तपोवनात या दिवशी बांगडया भरल्या जात → [ ]

२. [ ] ← अब्दुलमियाँने केलेल्या अनमोल गोष्टी → [ ]

दाजीसाहेब बोलत होते-

"रामानं सेतुबंधन केलं; पण त्यासाठी अनेकांचा हातभार लागला. अगदी लहानशी खार; पण तिनंसुद्धा आपल्या शक्तीप्रमाणे सेतुबंधनाला मदत केली. तशीच मदत या तपोवनासाठी देणाऱ्या काही व्यक्ती आम्हांला सुदैवाने लाभल्या आहेत. संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला बांगडया भरण्याचा प्रस्ताव जेव्हा समोर आला होता तेव्हा अनेक बांगडीवाल्यांना भेटून इथं येण्याबद्दल विनंती केली; पण कुणीही माझ्या विनंतीचा स्वीकार केला नाही. अब्दुलमियाँनी मात्र स्वतःहून इथं येण्याचं आश्वासन दिलं आणि दरवर्षी न चुकता अब्दुलमियाँ इथं येतात. येथील भगिनींच्या जीवनात आनंदाचा वर्षा व करतात. वर्षातले दोन दिवस तपोवनात अतिशय आनंदाचे आणि उत्साहाचे असतात. कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता अब्दुलमियाँ न बोलावता दरवर्षी येतात. तपोवनातील स्त्रिया, मुलीबाळी त्यांच्या येण्याकडे डोळे लावून बसलेल्या असतात. अब्दुलमियाँचे हे समाजकार्य, ही मानवसेवा खरोखर फार फार मोठी आहे. अनमोल आहे आणि म्हणूनच आज त्यांचा सत्कार करण्याचं ठरवलं आहे. तेव्हा त्या सत्काराचा स्वीकार अब्दुलमियाँनी इथं येऊन करावा."

Scanned by CamScanner

अब्दुल स्टेजवर चढला. दाजीसाहेबांनी फुलांचा गुच्छ आणि तपोवनातील लोकांनी तयार केलेली सुंदर फुलदाणी त्याला दिली.

२) १. कारण लिहा. (०१)

अब्दुलमियांचा तपोवनामध्ये सत्कार करण्यात आला कारण......

२. एका वाक्यात उत्तर लिहा. (०१)

अब्दुलला सत्कार समारंभात काय देण्यात आले ?

३) व्याकरण (०२)

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.

१. अगदी लहानशी खार; पण तिने सुद्धा आपल्या शक्तीप्रमाणे सेतुबंधनाला मदत केली.

२. चौथ-यावर अब्दुल बसला आणि क्षणातच सारा कामधंदा सोडून स्त्रियांची गर्दी जमली.

४) स्वमत (०२)

अब्दुलमियाँचे समाजकार्य अनमोल आहे; या दाजीसाहेबांच्या विधानाशी तुम्ही सहमत आहात का ? स्पष्ट करा.

## पदयविभाग

प्र. २ अ) पुढील ओळींचे रसग्रहण करा. (०४)

'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु"खात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे'

किंवा

दिलेल्या मुददयांच्या आधारे 'अंकिला मी दास तुझा' या कवितेची कृती सोडवा.

१. कवितेचे कवी
२. कवितेचा रचनाप्रकार
३. कवितेचा काव्यसंग्रह
४. कवितेचा विषय

## स्थूलवाचन

प्र. ३ १. टिपा लिहा. (०३)

१. वार्क  २. डॉ. होमी भाभा

## व्याकरण विभाग

प्र. ४ १) पुढील सामासिक शब्दाचा विग्रह करा. (०२)

१. दाणागोटा  २. यथाक्रम

Scanned by CamScanner

२) पुढील ओळींतील अलंकार ओळखा. (०२)

१. लहानपण देगा देवा ।
मुंगी साखरेचा रवा ॥

२. पार्वतीच्या पायथ्याशी पंढरीने पांढरा पक्षी पाहिला.

३) पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा. (०२)

१. मुलांनो, रांगेत चला.

२. तुला पेढा आवडतो का ?

३. माझ्या घराजवळ झाड आहे.

४. अरेरे ! पायाला किती लागले तुझ्या !

४) खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्तीचा प्रकार लिहा. (०२)

१. परिसरात        २. उत्साहाला

५) जोडया लावा. (०२)

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| १. सामना करणे | हिंमत न हारणे |
| २. गोडी लावणे | भीतीने शहारा येणे |
| ३. धीर न सोडणे | आवड लावणे |
| ४. अंगावर काटा येणे | मुकाबला करणे |

प्र. ४ आ) शब्दसंपत्ती

१) काळ ओळखा. (०१)

१. सुरेश उदया गावी जाईल.

२) पुढील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. (०१)

१. दर तीन महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे.

२. केलेले उपकार जाणणारा.

३) खालील शब्दांतील अक्षरापासून अर्थपूर्ण शब्द तयार करा. (०१)

विनाखरेचा

४) खालील शब्दाचे दोन वेगळे अर्थ लिहा. (०१)

[ ] ← पात्र → [ ]

५) खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. (०१)

१. बाहेरचे रूप        २. खूप चांगली संधी

६) समानार्थी शब्द लिहा. (०१)

१. लढा        २. साखर

७) विरूध्दार्थी शब्द लिहा. (०१)

१. विरोध        २. खाजगी

Scanned by CamScanner

८) अचूक शब्द ओळखून लिहा. (०२)

१. ग्यानपीठ / ग्यानपिठ / ज्ञानपिठ / ज्ञानपीठ

२. तुटपूंज्या / तुटपुंज्या /तूटपुंज्या / तुंटपुज्या

९) खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा. (०२)

मी खूप वाट पाहिली पण दादा आलाच नाही.

१० पारिभाषिक शब्द लिहा. (०२)

१. Honourable   २. Anniversary

## उपयोजित लेखन

१) पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा. (०७)

स्वच्छता हीच देशसेवा
स्वच्छता सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रम
दि. २ ऑक्टोबर, सकाळी १०.००
शालेय परिसर स्वच्छता.

विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने

उपक्रमात सहभागी विदयार्थ्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

स्वच्छता करण्यासाठी लागणा-या साहित्याची मागणी करणारे पत्र तुमच्या शाळेतील वरिष्ठ सेवकांना लिहा.

.........